**होमिओपॅथी महाविद्यालयाला मान्यता देण्याबाबत.**

श्री साई जनविकास प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर संचलित वेलनेस होमिओपॅथी कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर, गट नं. २५३, अलानी गडपती, जि. धाराशिव.

**महाराष्ट्र शासन**

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,

शासन निर्णय क्रमांक: एचएमसी-२०२६/प्र.क्र.२४(ई-१५३७२३९)/२६/शिक्षण-१,

९वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल, लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ००१.

दिनांक:- ३१ ऑगस्ट, २०२६.

**वाचा**:- १) शासनाचे समक्रमांकाचे दि.०७.०४.२०२६ रोजीचे ना-हरकत प्रमाणपत्र.

२) राष्ट्रीय होमिओपॅथी आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र क्र.४-७/२०२६-२७/NCH(MARBH)(११५-८२), दि.२४.०७.२०२६.

**प्रस्तावना**:-

श्री साई जनविकास प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर संचलित वेलनेस होमिओपॅथी कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर, गट नं. २५३, अलानी गडपती, जि. धाराशिव या होमिओपॅथीक महाविद्यालयास उपरोक्त वाचा- (१) येथील पत्रान्वये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात आले होते. तद्नंतर, सदर प्रमाणपत्र व तपासणीच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करिता राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाने उपरोक्त वाचा- (२) पत्रान्वये १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेसाठी महाविद्यालयास विहित कालावधीत त्रुटीपूर्तता करण्याच्या अधीन राहून मान्यता प्रदान केली आहे. यास्तव, सदर संस्थेस शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता १०० विद्यार्थी प्रवेशित करण्यास परवानगी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

श्री साई जनविकास प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर संचलित वेलनेस होमिओपॅथी कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर, गट नं. २५३, अलानी गडपती, जि. धाराशिव या महाविद्यालयास राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाने संदर्भ क्रमांक (२) येथील पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस विहित कालावधीत त्रुटीपूर्तता करण्याच्या मान्यता (LoP) दिलेली आहे. त्यानुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी होमिओपॅथी पदवी अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाकरिता सदर होमिओपॅथी महाविद्यालयास १०० विद्यार्थी प्रवेशित करण्यासाठी पुढील अटी व शर्तीच्या अधीन राहून परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती**:-

१. श्री साई जनविकास प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर संचलित वेलनेस होमिओपॅथी कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर, गट नं. २५३, अलानी गडपती, जि. धाराशिव या होमिओपॅथी महाविद्यालयातील विद्यार्थी प्रवेश क्षमता राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाने निर्धारित केल्यानुसार १०० एवढी राहील.

२. श्री साई जनविकास प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर संचलित वेलनेस होमिओपॅथी कॉलेज ॲन्ड रिसर्च सेंटर, गट नं. २५३, अलानी गडपती, जि. धाराशिव या संस्थेने उपरोक्त वाचा (२) येथील

पत्रात नमूद केल्यानुसार विहित कालमर्यादेत त्रुटींची पूर्तता करुन त्याबाबतचा अनुपालन अहवाल राष्ट्रीय होमिओपॅथी आयोग, नवी दिल्ली यांना सादर करावी.

३. राज्य शासन/केंद्र शासन/मा. सर्वोच्च न्यायालय अथवा मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या आदेशानुसार सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरिता निश्चित करण्यात आलेली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी.

४. शासकीय नियम / अधिनियमाच्या आधारे तसेच मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक शुल्कासाठी विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन त्यानुसार शैक्षणिक शुल्क निश्चित करण्यात यावेत.

५. केंद्र शासन, राष्ट्रीय होमिओपॅथी आयोग, आयुष मंत्रालय, नवी दिल्ली व राज्य शासन यांनी होमिओपॅथी अभ्यासक्रमाबाबत वेळोवेळी विहीत केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

६. महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्युशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट १९८८चा सहा) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

७. सदरहू संस्थेस कायम विनाअनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी अनुदानाची मागणी शासनाकडे करणार नाही.

८. शासकीय होमिओपॅथी किंवा तत्सम महाविद्यालयातील कोणत्याही अध्यापकास तो सेवानिवृत्त होईपर्यंत किंवा नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होईपर्यंत संस्थेमध्ये नोकरी देता येणार नाही किंवा त्याच्या सेवा संस्थेस वापरता येणार नाहीत.

९. राष्ट्रीय होमिओपॅथी आयोग, नवी दिल्ली यांनी परवानगी दिलेल्या विद्यार्थी प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी कोणत्याही परिस्थितीत संस्थेने प्रवेशित करु नये.

१०. राष्ट्रीय होमिओपॅथी आयोगाने दिलेली परवानगी ही सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरिता असून तद्नंतर सदर परवानगीचे दर वर्षी नूतनीकरण करून घेणे क्रमप्राप्त आहे. त्यानुसार पुढील शैक्षणिक वर्षात नव्याने विद्यार्थी प्रवेशित करण्यापूर्वी परवानगीचे नूतनीकरण करुन घेणे संस्थेवर बंधनकारक राहील.

११. गुणवत्तेवर आधारित प्रवेशित केलेल्या विद्यार्थ्यांच्या याद्या प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांचेकडून मंजूर करून घेणे व या अभ्यासक्रमासाठी आकारण्यात येणाऱ्या शुल्काची निश्चिती शुल्क नियामक प्राधिकरण यांच्याकडुन करुन घेणे, संस्थेसाठी बंधनकारक असेल.

१२.सदर शासन निर्णय हा राष्ट्रीय होमिओपॅथी आयोग, नवी दिल्ली यांनी वाचा- (२) येथील पत्रान्वये दिलेली परवानगी तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ अधिनियम, १९९८ मधील कलम ६४ नुसार शासनास प्रदत्त असलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANDEEP GORAKHNATH DHAKANE

Digitally signed by SANDEEP GORAKHNATH DHAKANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=418588839686584ca25060bf57af23a4473234ebcc421d084d8890fc37c8f673, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E7B44D71EACB46FA051532FB66A73DA715F678033161C1162FA83F6713D03552, cn=SANDEEP GORAKHNATH DHAKANE
Date: 2026.08.31 13:05:02 +05'30'

(संदीप ढाकणे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई

२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.

३) मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

५) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई.

६) संचालक, आयुष संचालनालय, मुंबई.

७) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

८) सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ९ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग, ए. के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई

९) आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर बिल्डींग,ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई

१०) सचिव, शुल्क नियामक प्राधिकरण, ३रा मजला, ४९, खेरवाडी, बांद्रा (पूर्व), मुंबई ४०००५१.

११) अध्यक्ष, श्री साई जनविकास प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर

१२) निवडनस्ती (शिक्षण- १).